## जाहीर नोटीस

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधिताने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे बो-हाडेवाडी** येथील **ग.नं.७०६ पैकी (जुना ग.नं.१०७० पैकी)** मधील **श्री.राहुल श्रीपती बो-हाडे व श्री.भिमराव सोपान बो-हाडे** व इतर यांचे तर्फे **कु.मु.धा.श्री.राहुल श्रीपती बो-हाडे**.यांच्या मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील **१२.०० मी** रस्त्याने बाधीत **३५४.५० चौ.मी** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्वेस- लागु रस्ता.
पश्चिमेस-ग.नं.७०६ पैकी उर्वरीत मिळकत
दक्षिणेस- लागु ग.नं.७०५
उत्तरेस- ग.नं.७०६ पै.ची मिळकत

परिशिष्ट २)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे रहाटणी** येथील **स.नं ९५/१/२ पैकी व ९६/२ पैकी,सि.स.नं. ५८८६ पैकी, ५९८२ पैकी व ५९८३ पैकी श्री बाळासाहेब रामभाऊ भोईर, श्री तुकाराम रामभाऊ भोईर, श्री**

महादेव शिवाजी भोईर, श्री पांडूरंग शिवाजी भोईर, श्री सुरेश शिवाजी भोईर, श्री प्रज्ञेश शिवाजी भोईर, श्रीम. संगीता रोहीदास सुतार व श्रीम. गंगुबाई शिवाजी भोईर यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ठ करण्यात आलेल्या भागातील ४५.० मी. रूंद रस्त्याने बाधित अंदाजे क्षेत्र ६४१४.०२ **चौ.मी.** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

**मौजे रहाटणी येथील स.नं ९५/१/२ पैकी व ९६/२ पैकी सि.स.नं. ५८८६ पैकी व ५९८२ पैकी ५९८३ पैकी ४५.० मी रूंद रस्त्याने बाधित अंदाजे क्षेत्र ६४१४.०२ चौ.मी**

पूर्व:- लागू स.नं.९६ पैकी सि.स.नं. ५९८३ पैकीची **मिळकत**

पश्चिम :- लागू स.नं. ९५ पैकीची **मिळकत**

उत्तर :- लागू स.नं. ९५ पैकी व ९६ पैकी, सि.स.नं. ५८८६ पैकी, ५९८२ पैकी व ५९८३ पैकीची मिळकत

दक्षिण :- स.नं. ९५ पैकी व ९६ पैकी, सि.स.नं. ५८८६ पैकी, ५९८२ पैकी व ५९८३ पैकीची **मिळकत**

**परिशिष्ट ३) मिळकतीचे वर्णन-** तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील गट नं.४२६ पै., व गट नं. ४३२ पै मधील श्री. भरत बाबुराव जाधव व श्री. कैलास भिकाजी जाधव यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता रूंदी या प्रयोजनाने बाधित अनुक्रमे ३०० चौ. मी व १३० चौ.मी. असे एकूण ४३०.०० चौ. मी. जमिन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:-

मौजे चिखली येथील गट नं.४२६ पै. व गट नं. ४३२ पै., १८ मी रस्ता रूंदी (बाधित क्षेत्र ४३०.०० चौ. मी )
उत्तरेस- लागू गट नं. ४२६पै. ची उर्वरित व गट नं. ४३२ पै. ची उर्वरित मिळकत
पूर्वेस- गट नं. ४२५ ची मिळकत
दक्षिणेस-- लागू गट नं. ४२६पै. ची उर्वरित व गट नं. ४३२ पै. ची उर्वरित मिळकत
पश्चिमेस- - लागू गट नं. ४३३ ची मिळकत

परिशिष्ट ४)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे पिंपळे सौदागर** येथील **स.नं. १३६/८ पै. व सि.स.नं. १२८० पै.** मधील **मे. ओम साई कन्स्ट्रक्शन तर्फे श्री. विजय पी. जगताप यांचे** मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे मंजूर विकास योजनेतील **१८.० मी. रूंद रस्ता** या प्रस्तावाने बाधित क्षेत्र ८९९.७५ **चौ.मी.** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

पुर्व - सि.स.नं. १२७९ ची मिळकत.

पश्चिम - सि.स.नं. १२८० पैकीची व उर्वरीत मिळकत.

उत्तर - सि.स.नं. १२८९ ची मिळकत.

दक्षिण - सि.स.नं. १२८० पैकीची मिळकत.

उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

जाहिरात क्र. ९९१८
दिनांक ८।२।१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.